# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी / फॅक्स : २५६५६२३४, E-Mail : ropune.dte@gmail.com; Website :www.ropune.org.in


**ई-मेल व्दारे**

जा.क्र.विकापु/आस्था-३(अ)/पदांचा फेर आढावा/२०१६/ 4337

दिनांक : 24 OCT 2016

**अत्यंत तातडीचे**

प्रति,

प्राचार्य/संचालक,

**सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालये यांना माहिती व कार्यवाहीसाठी**

**विषयः- विभागाच्या अधिपत्याखालील स्वायत्त तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी / पदविका/पदव्युत्तर पदवी व तत्सम अभ्यासक्रमांच्या संस्थातील शिक्षकीय तथा शिक्षकेतर पदांचा फेर आढावा माहिती सादर करणेबाबत**

**संदर्भः- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.५(३)/पदांचा फेर आढावा/ २०१६/१४७, दिनांक २० ऑक्टोबर २०१६**

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालये यांनी मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन विहित प्रपत्रात आवश्यक माहिती **दि. २७/१०/२०१६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत** विभागीय कार्यालयाच्या **est.ropune@gmail.com** या ई-मेल आयडीवर पाठवावी.

तरी सर्व शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी/पदविका व तत्सम संस्था/कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या संस्था / कार्यालयाकडून माहिती सादर करतांना ती अचूक आहे याची खात्री करुनच सादर करण्यात यावी. पदांच्या आढाव्यांमध्ये पदनाम, पदसंख्या व वेतनश्रेणी यांबाबतची कोणतीही त्रुटी राहणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेता आपल्या संस्था / कार्यालयाकडून अचूक माहिती अपेक्षित आहे.

**सोबत - मा. संचालक यांचे पत्र आणि आवश्यक प्रपत्र**

प्र. सहसंचालक

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001

**E-mail :- desk5@dte.org.in Web :- http://www.dte.org.in**

**कालमर्यादित** क्रमांक : 5(3)/पदांचा फेर आढावा/2016/९४८

दि 30.10.2016 दिनांक 20 OCT 2016

प्रति,

1. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये,
2. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई 51
3. सर्व प्राचार्य / संचालक, शासकीय /अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम संस्था.
4. सर्व प्राचार्य, शासकीय / अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.
5. सर्व उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये.

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील स्वायत्त तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांतील पदांचा फेर आढावा घेण्याबाबत...**

संचालनालयांतर्गत अधिनस्त शासकीय अशासकीय अनुदानित पदवी / पदविका व तत्सम संस्था / कार्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर पदांच्या आढाव्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन शासनाने दि 21.09.2016 च्या पत्रान्वये काही मुद्यांची माहिती सादर करण्यास आदेशित केले आहे.

तरी सर्व शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवि / पदविका व तत्सम संस्था / कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, आपल्या संस्था / कार्यालयाकडून माहिती सादर करताना ती अचूक आहे याची पूर्ण खात्री करुन संचालनालयास सादर करावी. सदर माहिती शासनास सादर केल्यानंतर त्यात काही त्रूटी आढळून आल्यास त्यास पूर्णता संस्था / कार्यालय प्रमुख जबाबदार असतील याची सर्व संस्था / कार्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी. पदांची माहिती सादर करताना खालील बाबी प्रकर्षाने लक्षात घ्याव्यात.

81/2011-2

1. संस्थेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर मंजूर पदांची माहिती अचूक असणे आवश्यक आहे.
2. 6 व्या वेतन आयोगानुसार पदास असलेली वेतनश्रेणी अचूक असणे आवश्यक आहे.
3. दि 26.11.2009 च्या शासन निर्णयानुसार संस्थेतील पदे स्थायी करण्यात आली आहेत ती पदे अचूक असणे आवश्यक आहे.

81/2011-3(31) 21/10/16

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 21 OCT 2016 12985

4. संस्थेतील भरलेल्या पदांची गणना करुन, संस्थेत किती टक्के पदे भरली आहेत याचे अचूक प्रमाणपत्र संस्था प्रमुखांनी देणे आवश्यक आहे.

5. शासकीय / अशासकीय अनुदानित पदवि तथा पदविका व तत्सम संस्थेतील काही पदांना वेगवेगळी वेतनश्रेणी मंजूर केली असल्यास त्याबाबत वेगळा खुलासा दर्शक टिप्पणी सोबत जोडावी.

6. शासकीय तथा अशासकीय अनुदानित पदवी / पदविका व तत्सम संस्थेतील ज्या पदांना 6 वा वेतन आयोग लागू झाला नाही अशा पदांची माहितीही कळविण्यात यावी. व याबाबत काही पत्रव्यवहार सुरु असल्यास आवश्यक कागदपत्रांसह संचालनालयास अवगत करावे. (न्यायालयीन प्रकरणासह).

7. काही पदांना 5 व्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी लागू केली आहे तथापि सदर वेतनश्रेणीबाबतच्या त्रृटीबाबतचा प्रस्ताव संस्थांनी सादर केला आहे. याबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांस संचालनालयास सादर करण्यात यावी.

8. 6 वा वेतन आयोग लागू न झालेल्या पदांची माहिती देण्यात यावी हि माहिती देताना सदर पदास 4 था व 5 व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी नमुद करण्यात यावी व 6 व्या वेतनआयोगात अपेक्षित वेतनश्रेणी नमुद करण्यात यावी.

9. सोबत जोडलेल्या प्रपत्रात शिक्षकेतर पदांबाबतची माहिती भरुन सादर करावी.

पदांचा आढाव्यामध्ये पदनाम, पदसंख्या व वेतनश्रेणी याबाबींची कोणतीही त्रृटी राहणार नाही याबाबतची दक्षता घेणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेता आपल्या संस्था / कार्यालयाकडून अचूक माहिती अपेक्षित आहे. तरी सदर माहिती लवकरात लवकर संचालनालयास desk5.dte@gmail.com यावर मेल करावी.

सर्व विभागीय कार्यालये यांना सूचित करण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी / पदविका व तत्सम संस्थेतील माहिती अचूक असल्याची खातरजमा करुन तसे प्रमाणित करुन माहिती एकत्रितरित्या संचालनालयास दि 30.10.2016 पर्यंत खास दुतामार्फत सादर करावी.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# प्रमाणपत्र

## प्रमाणित करण्यात येते की,

1. संस्थेतील सर्व पदनामे, पदसंख्या इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे.
2. संस्थेतील सर्व पदनामांची वेतनश्रेणी 6 व्या वेतन आयोगास अनुसरुन अचूक नमूद करण्यात आली आहे.
3. संस्थेतील ज्या पदांना 6 व्या वेतनआयोग लागू झाला नाही त्या पदांची माहिती अचूक देण्यात आली आहे.
4. संस्थेतील पदे 80% पदे भरण्यात आली आहेत. (कमी असल्यास तशी टक्केवारी देण्यात यावी.)

संस्था प्रमुखांची स्वाक्षरी

उपरोक्त माहिती तपासली असून ती अचूक आहे.

सहसंचालकांची स्वाक्षरी

प्रादेशिक कार्यालये व शासकीय / अशासकीय पदवी / पदविका व तत्सम संस्था

संस्थेचे नाव :

| पदनाम | 6 व्या आयोगानुसार पदास मंजूर असलेली वेतनश्रेणी | | मंजूर | | | भरलेली | | | रिक्त् | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतनबँड | ग्रेड पे | स्थायी | अस्थायी | एकूण | स्थायी | अस्थायी | एकूण | स्थायी | अस्थायी | एकूण |
| | | | | | | | | | | | |

( शिक्षकेतर पदांची माहिती देताना वर्ग 1 2 3 4 अशी पदनिहाय देण्यात यावीत. )

शिक्षकीय व शिक्षकेतर पदांना गोषवारा

| गट | मंजूर | | | | | | भरलेली | | | | | | रिक्त् | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | | अस्थायी | | एकूण | | स्थायी | | अस्थायी | | एकूण | | स्थायी | | अस्थायी | | एकूण | |
| | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर | शिक्षक | शिक्षकेतर |
| अ | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | | | | | | | | |
| क | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ड | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | |